# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 12 February 2025
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- एआय तंत्रज्ञानाचा विकास जबाबदारी तसंच सामाजिक आणि नैतिक हित लक्षात घेऊन करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
- देशाच्या सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत गेल्या दहा वर्षात ३२ पटीने वाढ झाल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- बचत गटांच्या उत्पादन विक्रीसाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा मॉल उभारणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाईचे आदेश–बारावीच्या परीक्षेला प्रारंभ
- ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १४९ पदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

****

एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता या तंत्रज्ञानाचं भविष्य यंत्र नव्हे तर मानवाच्या हातात आहे, त्यामुळे या तंत्रज्ञानाचा विकास जबाबदारी तसंच सामाजिक आणि नैतिक हित ध्यानात ठेवून होईल, याकडे लक्ष देण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पॅरिसमध्ये एआय कृती परिषदेत सह अध्यक्षपदावरुन ते काल संबोधित करत होते. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यावेळी उपस्थित होते. एआय क्षेत्राचा जबाबदारीनं वापर आणि नियमन यासाठी जागतिक पातळीवर एकत्रितरित्या प्रयत्न करण्याची गरजही पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. शिक्षण, आरोग्य, कृषी यासारख्या अनेक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्याची क्षमता या

तंत्रज्ञानात आहे, त्यामुळे जगातल्या कमी विकसित देशांनाही याचा लाभ मिळेल, याकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

****

गेल्या दहा वर्षात देशाची सौर ऊर्जा उत्पादन क्षमता ३२ पट वाढल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारत ऊर्जा सप्ताह २०२५ चं काल दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारत फक्त स्वतःच्या विकासालाच नव्हे तर जगाच्या विकासालाही चालना देत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ऑक्टोबर २०२५ पूर्वीच इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचं उद्दीष्ट साध्य करण्याच्या मार्गावर भारत अग्रेसर असल्याची माहिती त्यांनी दिली, ते म्हणाले:

> ***"आज भारत 19% इथेनॉल ब्लॅंडींग कर रहा है। इससे फॉरेन एक्सचेंज की सेव्हिंग हुई है। और सबस्टेंशियल फार्मर रेव्हेन्यू जनरेट हुआ है। हम ऑक्टोबर 2025 से पहले ही 20% इथेनॉल मॅनडेट अचिव्ह करने की राह पर है।"***

दरम्यान, भारत ऊर्जा सप्ताह हा जागतिक स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा हा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम आहे. या सप्ताहात देशातली यशस्वी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही जागतिक स्तरावर स्वीकारार्ह आदर्श योजना म्हणून सादर केली जाणार आहे.

****

केंद्रीय अर्थसंकल्पात विकास आणि वित्तीय प्राधान्य यांचा समतोल साधण्यात आल्याचं प्रतिपादन, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. त्या काल लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होत्या. देशाच्या आर्थिक वृद्धीचा दर जगात सर्वाधिक असेल, यासाठी केंद्र सरकार प्रयत्नरत असून, चलनवाढीचा दर दोन ते सहा टक्क्यांच्या दरम्यान ठेवण्यावर सरकारचा भर असल्याचं, अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

****

केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्यावतीने मुंबईमध्ये ऑडीओ व्हिज्युअल एंटरटेंटमेंट समिट–वेव्ज २०२५ या जागतिक संमेलनाचं येत्या एक ते चार मे दरम्यान आयोजन करण्यात येणार आहे. काल या आयोजनाबाबत बैठक

झाली, संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत सांगितलं.

****

दरम्यान, मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलात भरवण्यात आलेल्या "महालक्ष्मी सरस विक्री आणि प्रदर्शनाचं काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालं. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून, मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत, तसंच 'उमेद'च्या माध्यमातून राज्यभरातलू बचत गटांना हक्काचं विक्रीचं साधन उपलब्ध व्हावं, यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार उभारणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

> ***''असा निर्णय करा की पहिल्या एका वर्षात किमान दहा जिल्ह्यांमध्ये तरी मॉल ची सुरुवात झाली पाहिजे. त्याकरता राज्य सरकार म्हणून जी काही मदत तुम्हाला हवी आहे, ती आपण करणार आहोत. अशा विविध योजना आपण याकरता हातामध्ये घेतल्या आहेत, की एकदा या सगळ्या योजनांचा उपयोग होऊन आमच्या महिला या अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आल्या पाहिजेत.''***

दरम्यान, राज्यातल्या दहावी तसंच बारावीच्या परीक्षांमध्ये सामूहिक कॉपीच्या घटनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश, मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या सर्व जिल्हाधिकारी तसंच पोलीस अधिकाऱ्यांना यांना दिले आहेत. अशा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करावी, तसंच कॉपी प्रकरणी मदत करणाऱ्या शिक्षक तसंच कर्मचाऱ्यांना सेवेतून थेट बडतर्फ करण्याचे निर्देश त्यांनी काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिले.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला कालपासून सुरुवात झाली.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल शहरात देवगिरी महाविद्यालयातल्या परीक्षा केंद्रास भेट देऊन पाहणी केली. नांदेड जिल्ह्यात इंग्रजीच्या परीक्षेला काल ९४८ विद्यार्थी अनुपस्थित राहिल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

बीड जिल्ह्यात परिक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शिक्षण विभाग आणि प्रशासन प्रयत्नशील आहे, मात्र बीड शहरात काही परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट पहायला मिळाला.

जालना जिल्ह्यात किरकोळ अपवाद वगळता बारावीचा पहिला पेपर सर्व केंद्रावर सुरळीत पार पडला. भरारी पथकांनी तीन केंद्रांवर नऊ विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात आज माघ पोर्णिमेच्या स्नानाला सुरुवात झाली. प्रशासनाकडून यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. १३ जानेवारी रोजी महाकुंभमेळ्याला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत ४६ कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सामाजिक संपर्क माध्यमांवरच्या कार्यक्रमांसाठी नियमावली आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची सूचना, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाला केली आहे. यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया याने केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याची आयोगानं गांभीर्याने दखल घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

****

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांच्या पार्थिव देहावर काल छत्रपती संभाजीनगर इथं शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बोराडे यांचं काल सकाळी छत्रपती संभाजीनगर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. बोराडे यांच्या निधनाबद्दल साहित्य आणि शिक्षण क्षेत्रासह समाजाच्या सर्वच स्तरातून दु:ख व्यक्त होत आहे. ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांनी बोराडे यांच्या साहित्याचं वेगळेपण सांगत, आपल्या भावना व्यक्त केल्या..

> ***‘‘मराठवाड्याची अशी खास ग्रामसंस्कृती आहे. त्या ग्रामसंस्कृतीचा वेध रा रं बोराडे यांनी घेतला. म्हणून त्यांची कथा, कादंबरी एका अर्थानं प्रादेशिकही आहे. आधुनिकीकरणाचा जो परिणाम, मराठी ग्रामीण जीवनावर झाला, त्याचंही अतिशय सखोल असं चित्र बोराडेंनी रेखाटलं. मराठीतला हा एक मोठा असा लेखक आपल्यातून गेला, ही एक अतिशय दु:खद घटना आहे.’’***

ज्येष्ठ साहित्यिक डॉ छाया महाजन यांनी बोराडे यांना या शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली..

> ***"ग्रामीण साहित्यातले उत्कृष्ट लेखक म्हणून बोराडे सरांचं नाव प्रामुख्याने घेतलं जातं. त्यांची पाचोळा फार सुंदर कांदबरी. पण मी जेव्हा आमदार सौभाग्यवती पाहिला त्यांचा, तेव्हा मला वाटलं की सरानां प्रत्येक क्षेत्रामध्ये रुची आहे. आणि त्याचा अभ्यास करून त्या पद्धतीनं त्यानं ते लिहिलेलं आहे. त्यांनी शिवार पुरस्कार दिले. लेखकाला प्रोत्साहन द्यायचे. साहित्य क्षेत्राची खऱ्या अर्थाने हानी झाली असं मी निश्चित म्हणेल. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली."***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बोराडे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने काल जिम्नॅस्टिक्स मध्ये सहा सुवर्ण आणि दोन रौप्य पदकांची कमाई केली. टेबल टेनिसमध्ये राज्याच्या संघाने रौप्य पदक जिंकलं. पदकतालिकेत महाराष्ट्र सध्या एकूण १४९ पदक जिंकून दुसऱ्या स्थानावर आहे. यामध्ये ४१ सुवर्ण, ५४ रौप्य, तर ५४ कांस्य पदकांचा समावेश आहे. सेनादल ५५ सुवर्ण पदकांसह पहिल्या, तर कर्नाटक ३३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

****

वृक्षारोपण आणि संवर्धन ही सामाजिक जबाबदारी असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीनं घेण्यात आलेल्या, वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्याप्रसंगी ते काल बोलत होते. बांबू आणि चंदनासह फळबागांचं अर्थशास्त्र समजून घेण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

****

हिंगोली जिल्ह्यातले शेतकरी आपल्या विविध मागण्यांसाठी मुंबईत अर्धनग्न आंदोलन करण्यासाठी रवाना झाले आहेत. मानखुर्द ते मंत्रालय असं २० किलोमीटर अंतर

अर्धनग्न अवस्थेत पायी चालून मंत्रालयासमोर हे शेतकरी आंदोलन करणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे, त्यापूर्वी काल हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या शेतकऱ्यांनी आंदोलन केलं.

****

कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण तालुक्यातल्या पाचोड इथल्या ग्रामीण रुग्णालयात, कॅन्सर डायग्नोंस्टिक व्हॅनचं लोकार्पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणाली द्वारे करण्यात आलं. या व्हॅनमध्ये सॉफ्टवेअरद्वारे मुख कर्करोग तपासणीची सुविधा आहे.

****